E/Jagruti/Kalam 88

# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी तालुका, भिवंडी

## यांचे कार्यालय

जकात नाका, सेंट्रल हॉस्पीटलच्या वरती, दत्तात्रय कृपा बिल्डींग, तिसरा मजला, ता. भिवंडी, जि. ठाणे

१४६२

जा.क्र. सनिभि/बी-१/कलम ८८/ओमकार ग्रा.बि.शे.पत/सन २०१८

दिनांक :- ०९/०२/२०१८.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

**वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद**
**२) श्री. अे. जी. जाधव, प्रमाणित लेखापरिक्षक यांचा दिनांक १०/०१/२०१८ रोजीचा कलम ८३ अंतर्गत चौकशी अहवाल.**

ज्याअर्थी, **ओमकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, अंबाडी नाका ता. भिवंडी, जि. ठाणे** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था असून ती या कार्यालयाच्या कार्यक्षेत्र येते आणि,

ज्याअर्थी, **ओमकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, अंबाडी नाका ता. भिवंडी, जि. ठाणे** या संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अहवाल दि. १०/०१/२०१८ रोजी सादर केला आहे. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन करता त्यांनी संस्थेच्या कामकाजात सभासदांच्या ठेवीच्या रक्कमा परत करण्यास निधीची कमतरता, संस्थेचे व्यवहार पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी पारदर्शकपणे न करणे. कायदा कानुन व पोटनियमाचे सर्रास उल्लंघन करुन कर्ज वितरण करणे, कमी दराने व्याज आकारणी अशा प्रकारच्या संस्थेच्या कामकाजात गंभीर बाबी व त्रुटी निदर्शनसा आल्या असल्याचे अहवालात नमुद करुन संस्थेस सन २००० ते २०१६ कालावधीत रु. ३१३३९२२/- इतक्या रक्कमेचे कर्ज थकीत झालेले आहेत. सदर नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संचालक मंडळ व सदस्यांवरती जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करणेसाठी शिफारस केलेली आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या व इतर सदस्यांनी तारण कर्जे, कमी जास्त दराने व्याज आकारणी संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कडील कर्जे, कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांचेकडील व इतर थकीत कर्जाबाबत संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये १६ वर्षे वसुली दावे दाखल न केल्यामुळे अशा प्रकारची कर्जे वितरित करुन संस्थेस आर्थिक नुकसान झालेले असून सदर नुकसानीची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले समिती सदस्याची व कर्मचारी यांची असून सदर नुकसानीची आकारणी करणे व नुकसानीची व्याजासह भरपाई करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे आणि,

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## : आदेश :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी आर. एस. लोखंडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी **ओमकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, अंबाडी नाका ता. भिवंडी, जि. ठाणे** या संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी यांनी संस्थेच्या निधीचे केलेले उपयोजन, अपहार, त्यांनी केलेले अपकार्य व विश्वासघात व त्यामुळे संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची आकारणी करुन व्याजासह भरपाईची रक्कम निश्चित करण्यासाठी प्रधिकृत अधिकारी म्हणुन **श्री आर. के. भास्कर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड** यांची नियुक्ती करण्यात येत आहे.